## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-१२२२/२०२१

**अपिलार्थी, श्री. एस.व्ही.कदम**

**ए/१११-०२, सेक्टर २१, तुर्भे, नवी मुंबई ४०० ७०३**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सहा आयुक्त परिमंडळ-१
नवी मुंबई महानगरपालिका, १ ला मजला
बेलापूर भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपायुक्त परिमंडळ-१
नवी मुंबई महानगरपालिका, १ ला मजला
बेलापूर भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २.४.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.१२.२०२० | --- | २१.१.२०२१ | --- |

अपिलार्थी यांनी दि.२९.४.२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय प्राधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २.४.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी ऑनलाईन सुनावणीसाठी मागणी केली होती. तथापि, या कार्यालयाकडून केल्या गेलेल्या दुरध्वनींना अपिलार्थी साथ देत नसून ऑनलाईन सुनावणीस रुजू झालेले नाहीत. यास्तव अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुदेश परब,सहाय्यक आयुक्त,परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"(Provide certified copies of information on my grievance made on dt.२४.११.२०२० to your office from २४.११.२०२० to till the date by Hand delivery.)"

१. Provide Action Taken Report, including file notings on said grievence.

२. Provide names, designation, contact details of the officers responsible for actiong on the above grievence.

३. Provide the details of disciplinary action taken under MMC Act, १९४९ for not resolving my above grievence.

४. Provide the standard operationg procedure u/s ४ (१) (b) if RTI Act for resolving my above grievance.

५. Standard time frame to resolve above grievance under MMC Act.

६. Copy of my complaint. PIO please note U/s १८ complaint tha State Information Commissioner shall impose the fine of Rs. २५०/- per day or २५,०००/- maximum can be levied and they shall direct against the PIO u/s १९ (८) (b), २० (१), २० (२).

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती नाकारण्यात आली." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत उपलब्ध माहिती दिलेली नाही.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेवर प्रत्येक दिवसासाठी रु. २५०/- (अधिकतम रु. २५,०००/-) इतका दंड का करण्यात येऊ नये याची विचारणा करणारी "कारणे दाखवा" नोटीस पाठविणे उचित होईल.

सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान असे सांगितले की, आम्ही अपिलार्थीस तातडीने माहिती उपलब्ध करून देतो. तरी सदरची सर्व उपलब्ध माहिती अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करून देणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका यांनी **अपिलार्थी यांना सर्व उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त), सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाला अनुसरून विहित मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा **लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.२७.५.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता समक्ष उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२७.५.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २ एप्रिल, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त), सहाय्यक आयुक्त परिमंडळ-१
नवी मुंबई महानगरपालिका, १ ला मजला, बेलापूर भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
-यांना प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त परिमंडळ-१
नवी मुंबई महानगरपालिका, १ ला मजला, बेलापूर भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ याचेमार्फत रवाना.

**अपिल क्रमांक : के. आर-१२२२/२०२१**

**अपिलार्थी, श्री. एस. व्ही. कदम**

**सुनावणी दिनांक २७.०५.२०२४ ( In Continuation of order dt.०२.०४.२०२४)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणाची वस्तुस्थिती अशी आहे की, आयोगाने दि.०२.०४.२०२४ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांना १५ दिवसात माहिती पुरविणेबाबत तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त) सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका यांना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबतच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतकी शास्ती का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित करण्यात आलेले होते.

तथापि आजच्या सुनावणीच्या वेळी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे कोणतीही सुचना न देता सुनावणीसाठी अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुपस्थितीबाबतची कारणे समजू शकली नाहीत. तसेच अपिलार्थी यांनी त्यांना अद्यापर्यंत कोणतीही माहिती पुरविण्यात आलेली नसल्याचे, आजच्या सुनावणी दरम्यान सांगितले.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या दि.०२.०४.२०२४ रोजीच्या आदेशानंतर सुध्दा अपिलार्थी यांना माहिती पुरविली नाही. यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१)

अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त), सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका यांना सुनावणीची सुचना विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे मार्फत देण्यात आलेली आहे. तथापि त्यांना सदर सुनावणीची सुचना मिळाली की नाही, हे समजून येत नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पुन्हा नोटीस काढणे योग्य होईल. तत्कालीन जन माहिती अधिकारी, श्री.दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त), यांनी आयोगाच्या दि.०२.०४.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा खुलासा आयोगाकडे पुन्हा सादर करणे योग्य होईल. त्यांना पुन्हा नोटीस काढणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त), सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका यांना पुन्हा नोटीस काढण्यात यावी. तसेच त्यांनी दि.३१.०७.२०२४ रोजीच्या सुनावणीच्यावेळी उपस्थित राहून, दि.०२.०४.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा खुलासा आयोगाकडे सादर करावा.

२. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुदेश अ.परब, सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका यांनी आयोगाच्या दि.०२.०४.२०२४ रोजीच्या आदेशाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी दि.३१.०७.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून, आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३१.०७.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

सही/-

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २७ मे, २०२४.

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त) व
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुदेश अ.परब,
सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका,
१ ला मजला, बेलापूर भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अपिल क्रमांक : के.आर-१२२२/२०२१**

**अपिलार्थी, श्री. एस. व्ही. कदम**

**सुनावणी दिनांक ३१.७.२०२४ ( In Continuation of order dt.२७.५.२०२४)**

**विवेचन**

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.२९.४.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३१.७.२०२४ रोजी पुनर्सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुदेश अंकुशराव परब, सहाय्यक आयुक्त, (परि-१), नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर विभाग हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती देण्यास वेळेची मागणी केली आहे. सबब, त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२४.९.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३१ जुलै, २०२४

**अपिल क्रमांक : के.आर-१२२२/२०२१**

**अपिलार्थी, श्री. एस. व्ही. कदम**

**सुनावणी दिनांक २४.९.२०२४ ( In Continuation of order dt. ३१.७.२०२४)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. दत्तात्रय काशिनाथ नागरे, (सेवानिवृत्त), सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुदेश अंकुशराव परब, सहाय्यक आयुक्त, (परि-१), नवी मुंबई महानगरपालिका, बेलापूर विभाग हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. दत्तात्रय काशिनाथ नागरे, (सेवानिवृत्त), सहा. आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका यांनी दि.३०.७.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, सदर माहितीचा अर्ज त्यांनी दि.२१.१२.२०२० रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, (तुर्भे), नवी मुंबई महानगरपालिका यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) अन्वये हस्तांतर केला होता. त्यामुळे विलंबाचा कालावधी क्षमापित करण्यात यावा.

त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुदेश अ. परब, सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका यांनीही दि.२४.९.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, सदरचा माहिती अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही यास्तव अपिलार्थींना त्यावेळी उत्तर देण्यात आले नाही. तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद केलेल्या तक्रारीबाबत त्यांनी दि.२४.११.२०२० रोजी कार्यालयात केलेल्या ग्रिव्हेन्सबाबतच्या केलेल्या कार्यवाहीची माहिती ही तांत्रिक पोर्टलवरची असल्याने त्या दिवशीचे पोर्टल तपासता अपिलार्थी यांचा दि.२४.११.२०२० रोजीचा कोणताही ग्रिव्हेन्स दिसून आलेला नाही.

उपस्थित जन माहिती अधिकारी करीत असलेला युक्तिवाद हा एकाच वेळी हास्यास्पद आहे तर तो तितकाच गंभीरदेखील आहे. आज युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेला दि.२४.११.२०२० रोजीचा तक्रार अर्ज त्यांना सापडत नाही. व आता त्यांचे असे म्हणणे आहे की, प्राप्त झालेला माहिती अधिकार अधिनियमांतर्गतचा अर्ज त्यांना सापडत नाही.

माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त माहिती अर्जावर माहिती देणे तर दूर पण तो अर्जच सापडत नाही अशा प्रकारचा युक्तिवाद उपस्थित जन माहिती अधिका-यांनी सुनावणी दरम्यान केला आहे. ही अतिशय गंभीर बाब असल्याने यात **आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका** यांनी लक्ष घालण्याची आवश्यकता दिसून येते. व ज्या पध्दतीने हे प्रकरण हाताळले आहे यासठी संस्था म्हणून नवी मुंबई महानगरपालिकासुध्दा जबाबदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

सबब, **आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका** यांनी अपिलार्थी यांचा दि.२४.११.२०२० रोजीचा तक्रार अर्ज तसेच त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत सादर केलेला अर्ज हे दोन्ही अर्ज त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्याबाबत योग्य त्या अधिका-यांची नेमणूक करून तसेच त्यांचेमार्फत चौकशी करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे पुढील सुनावणीस सादर करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे या संपूर्ण प्रकरणात अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या मनस्तापाबद्दल नवी मुंबई महानगरपालिका यांच्या प्राधिकरणाकडून अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (८) (ख) अंतर्गत

रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) इतकी नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. **आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका** यांनी अपिलार्थी यांचा दि.२४.११.२०२० रोजीचा तक्रार अर्ज तसेच त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत सादर केलेला अर्ज हे दोन्ही अर्ज त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्याबाबत योग्य त्या अधिका-यांची नेमणूक करून तसेच त्यांचेमार्फत चौकशी करावी व त्याबाबतचा **लेखी अहवाल आयोगाकडे दि.१२.१२.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता सादर करावा.**

२. या संपूर्ण प्रकरणात अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या मनस्तापाबद्दल नवी मुंबई महानगरपालिका यांच्या प्राधिकरणाकडून अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (८) (ख) अंतर्गत रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) इतकी नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे दि.१२.१२.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.**

३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१२.१२.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल.**

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २४ सप्टेंबर, २०२४

**<u>आदेशातील मुद्दा क्र. १ च्या अनुपालनार्थ प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,</u>**
**आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका,**
१ ला मजला, बेलापूर भवन, सेक्टर-११,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त) व
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.सुदेश अ.परब,
सहाय्यक आयुक्त, परिमंडळ-१, नवी मुंबई महानगरपालिका,
१ ला मजला, बेलापूर भवन, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अपिल क्रमांक : के.आर-१२२२/२०२१**

**अपिलार्थी, श्री. एस. व्ही. कदम**

**सुनावणी दिनांक १२.१२.२०२४ (In continuation of order dt. २४.९.२०२४)**

<u>विवेचन</u>

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. दत्तात्रय नागरे (सेवानिवृत्त), सहा. आयुक्त तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुदेश अंकुश परब, सहा. आयुक्त (सेवानिवृत्त) आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. सोमनाथ पोटरे, उप आयुक्त (परि.१) नवी मुंबई महानगरपालिका तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उमेश एन. पाटील, उप अभियंता (मुख्यालय), नवी मुंबई महानगरपालिका हे उपस्थित आहेत.

दि.२४.९.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी मुद्दा क्र. १ द्वारे असे आदेशित करण्यात आले होते की, "*आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांचा दि.२४.११.२०२० रोजीचा तक्रार अर्ज तसेच त्यांनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत सादर केलेला अर्ज हे दोन्ही अर्ज त्यांच्या कार्यालयातून गहाळ झाल्याबाबत योग्य त्या अधिका-यांची नेमणूक करून तसेच त्यांचेमार्फत चौकशी करावी व त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे दि.१२.१२.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता सादर करावा.*"

तथापि, या संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे श्री.सोमनाथ पोटरे, उपायुक्त, परिमंडळ-१ यांनी सुनावणी दरम्यान असा खुलासा केला की, आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्यांची नियुक्ती केली आहे. व या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगाकडे पुढील १ आठवडयात सादर करण्यात येईल.

त्याचप्रमाणे दि.२४.९.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी मुद्दा क्र. २ द्वारे असेही आदेशित करण्यात आले होते की, *"या संपूर्ण प्रकरणात अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या मनस्तापाबद्दल नवी मुंबई महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाकडून अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (८) (ख) अंतर्गत रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) इतकी नुकसान भरपाई का देण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे दि.१२.१२.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा."*

त्या अनुषंगाने उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा लेखी खुलासा सादर केला की, अपिलार्थींनी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे दि.३०.९.२०२० रोजी अर्ज सादर केला होता. त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्यासाठी नस्तीची तपासणी करण्याकरीता अपिलार्थीस दि.१६.१०.२०२० रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते. तथापि, अपिलार्थींनी त्यास नकार दिला. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना अपेक्षित असेलली माहिती पुरविण्यासाठी देण्यात येणा-या साक्षांकित प्रतींसाठी लागणारे शुल्क भरणा करण्यसाठी दि.१४.१०.२०२० रोजीच्या पत्राद्वारे कळविले होते. त्यानंतर अपिलार्थींना दि.१५.१.२०२१ रोजी माहिती पुरविण्यात आली.

त्या दरम्यान अपिलार्थी यांनी उपायुक्त, परिमंडळ-१ यांचेकडे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. उमेश पाटील यांचेविरूध्द संबंधितांना माहिती मिळावी याबाबत दि.२४.११.२०२० रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यानुसार उपायुक्त परिमंडळ-१ यांना दि.२.१२.२०२० च्या पत्रानुसार सदर अर्ज कार्यकारी अभियंता (तुर्भे), नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित केला. तत्पश्चात अपिलार्थी यांनी उपायुक्त, परिमंडळ-१ यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत ऑनलाईन अर्ज क्र.NMMCO/R/२०२०/६०४५६ व NMMCO/R/२०२०/६०४५५ दि.१०.१२.२०२० अन्वये दि.२४.११.२०२० रोजीच्या या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त, परिमंडळ-१ यांनी सदर माहिती अधिकार अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (तुर्भे), नवी मुंबई महानगरपालिका यांना दि.२१.१२.२०२० रोजी हस्तांतरीत केला. सदर प्रकरणी तुर्भे विभाग कार्यालयातील अभिलेख तपासले असता अपिलार्थी श्री. एस. व्ही. कदम यांच्या माहिती अधिकार अंतर्गत केलेल्या दि.३०.९.२०२० रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, तुर्भे यांनी दि.१५.१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती पुरविली आहे त्यामुळे अपिलार्थी यांनी दि.२४.११.२०२० रोजी दिलेल्या तक्रारीवर अभियंता विभागाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. अपिलार्थी यांनी नमूद केलेल्या दि.२४.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये विचारलेली माहिती देण्यात आली असल्याने नवी मुंबई महानगरपालिकेवर कोणतीही शास्ती लादण्यात येऊ नये, असा लेखी खुलासा सादर केलेला आहे.

या प्रकरणी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांचा तक्रार अर्ज गहाळ झाल्याबाबत चौकशी अधिका-यांची नेमणूक केली असल्याने त्यांचे अहवालासाठी प्रकरण पुढील तारखेवर ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२०.२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ डिसेंबर, २०२४

संगणक -10